www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 182 वा मंगळवार दि. 18 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सर्वांसाठी अभिमानास्पद : देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भिवंडी येथील

# छत्रपती शिवाजी महाराज मंदिर (शक्तीपीठ) लोकार्पण संपन्न

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, सर्वांसाठी दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब असून सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. येथे महाराजांच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवक्षेत्र मराडे पाडा, ता.भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर (शक्तीपीठ) लोकार्पण संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, प.पू. बालयोगी सदानंद बाबा, ह.भ.प डॉ.कैलास महाराज निचिते, राष्ट्रसंत



नीलकंठ शिवाचार्य, प.पू. आलोकनाथ महाराज, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, आमदार दौलत दरोडा, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौघुले, शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजू चौधरी, श्री. विश्वनाथ पाटील, नरेंद्र पवार, जितेंद्र डाकी, विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, श्री. अनंता भोईर, आदी मान्यवर उपस्थित होते.



सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देत त्यांनी कैलास निचिते व राजू चौधरी यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मंदिराच्या संकल्पना व प्रत्यक्ष निर्माणाकरिता कौतुक केले. ते म्हणाले की, आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आपल्या इष्ट देवतेचे मंदिरात जावून दर्शन घेवू शकतो. देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, त्यांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब आहे. अतिशय सुंदर, भव्य दिव्य असे हे मंदिर निर्माण करण्यात आले आहे. या मंदिराला सुंदर तटबंदी आहे, अतिशय चांगले बुरुज आहे, दर्शनीय अशा प्रकारचा प्रवेशाचा मार्ग, बगीचा आहे आणि या मंदिराच्या **पान २ वर**



# क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

क्रांतिकारी शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य यांचे संस्थापक/सचिव श्री शाहीद कादरी सर आणि त्यांच्या टीमच्या वतीने दिनांक १७ मार्च २०२५ रोजी सना फंक्शन हॉल, बीड येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते. क्रांतिकारी शिक्षक संघटना मागील अनेक वर्षांपासून शैक्षणिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी संघटनेने महत्त्वपूर्ण पावले उचलली असून समाजात बंधुता आणि एकता निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. या इफ्तार पार्टी च्या यशस्वी आयोजनामध्ये संघटनेचे संस्थापक राज्य सचिव श्री शाहीद कादरी सर, बीड जिल्हाध्यक्ष श्री असरार खान सर, गायकवाड सर, अजीज राजा सर, पवार सर, कांबळे सर, समीर सर, सगीर सर, परवेज सर, अनवर सर, तसेच इतर सदस्यांनी मोलाचे योगदान दिले. या कार्यक्रमा दरम्यान उपस्थित मान्यवरांनी समाजामध्ये बंधुभाव, सलोखा आणि शैक्षणिक सुधारणांचे महत्त्व या वर भर दिला. या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य आणि सौहार्दाचा संदेश प्रसारित होण्यास मदत झाली.



# समूह पुनर्विकास प्रकल्पाचे प्रणेते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे तसेच स्वप्नपूर्ती मा आमदार सदा सरवणकर यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी, राकेश रमेश पाटील**

समूह पुनर्विकास प्राकल्पः नव्या पर्वाची भक्कम पायाभरणी ! ८०० कुटुंबांना मिळणार हक्काचे ५२५ कार्पेट चे मालकी हक्काचे घर, विश्वासाच्या पायावर उभे राहून, नव्या भविष्याकडे वाटचाल! १६ मार्च २०२५ रोजी रवींद्र नाट्यमंदिर सभागृह, प्रभादेवी येथे सुगी डेव्हलपर्स तर्फे खेड गल्ली परिसर पुनर्विकास प्रकल्प क्र. २ संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रकल्पाच्या प्रगतीचे सादरीकरण करण्यात आले तसेच रहिवाशांना पुनर्विकास प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सुगी डेव्हलपर्स चे संचालक श्री. कर्णिक यांनी प्रकल्पाच्या प्रस्तावित आराखड्याचे प्रभावी सादरीकरण केले. सदर बैठकीला श्री. राहुल शेवाळे (माजी







खासदार), श्री. सदा सरवणकर (अध्यक्ष – श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, राज्यमंत्री दर्जा) श्री. समाधान सरवणकर (माजी नगरसेवक) मान्यवरांची उपस्थिती लाभली

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून जिज्ञासा कडूला उच्च शिक्षणासाठी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

वैद्यकीय शिक्षणासाठी पनवेल येथील जिज्ञासा कडू हिला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते जिज्ञासाला सुपूर्द करण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. जिज्ञासाने एमबीबीएस शिक्षण पूर्ण केले असून ती पुढील वैद्यकीय शिक्षण सांगलीमधील प्रकाश इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स अँन्ड रिसर्च येथे 'मास्टर ऑफ सर्जरी' हे शिक्षण घेणार आहे. त्यासाठी तिला आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार तिला मदत करण्यात आली असून मदतीचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी



जिज्ञासाचे अभिनंदन करुन तीला पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी तिचे वडील ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, आई भारती कडू, ऍड. परेश गायकवाड, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.

# "सोलाव" वरीस नाय !! तर "बाराव "वरीस हे धोक्याचं !!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

बाळाचा पाळणा ते तारुण्याचा झुला हे अंतर जिवापाड प्रेम करत तिच्या स्वप्नांना बळ देत लाखो पालक आपले स्वतःचे स्वप्न जगत असतात. आई-वडिलांच्या प्रेमाचे हे दोर तोडून अनेक मुलींचे दोर नकळतपणे असुरक्षिततेच्या हिंदोळ्याला बांधले जातात .मुलींच्या बऱ्या वाईट कल्पनाने आयुष्यभर तीच्या आठवणीने झुरत राहणे अनेक कुटुंबाच्या वाट्याला येत आहे. याला कारण अल्पवयीन मुले मुली बेपत्ता होण्याचे प्रकार घडत आहेत त्यात मुलींचे प्रमाण जास्त आहे यामध्ये बालवयात घसरणारा तोल कारणीभूत आहे. प्रेमाच्या भुतापांना बळी पडून अल्पवयीन मुली घर सोडत असल्याचे



दिसून येते .बहुतांश अल्पवयीन मुली प्रेमाच्या जाळ्यात अडकून घर सोडत आहेत .काही जणी कौटुंबिक वादातून घरातून निघून जात आहेत. काहींना अभ्यासाचा ताण असह्य झाल्याने निघून जात असल्याचे समोर आले आहे अल्पवयीन मुली प्रेमाच्या जाळ्यात ओढल्या जात आहेत त्याला कारण सोशल मीडिया ही कारणीभूत ठरत आहे. सोशल मीडियावरील मायावी जीवनाला भुलून वरवरच्या सौंदर्याकडे आकर्षित होऊन तसेच जीवन जगण्याची भावना जागृत होते. मग त्यातून अनोळखीची तरुणाकडे आपले सर्वस्व सोपवले जाते. अल्पवयीन मुलींना लग्नाच्या आमीष दाखवून अत्याचार केल्याचे अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये बहुतांश मुली १२ ते १८वयोगटातील असल्याचे समोर आले आहे .गेल्या वर्षी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रातून ४१२ अल्पवयीन मुले मुली बेपत्ता झाले होते. त्यापैकी अनेकांचा शोध पोलिसांनी घेतला असून अजून बरेच मुलं मुली यांचा ठावठिकाणाक अजून पोलिसांनाही लागलेला नाही. विद्यार्थी आणि पालकांमध्ये सुसंवाद संपत असल्याचे दिसून आहेत त्यामुळे मुले घराबाहेर सहानुभूतीचा आधार शोधत कोणावरही विश्वास ठेवत आहेत. त्यामुळे अठरा, सोळा नाही तर बाराव वरीस देखील धोक्याचे झाले आहे.



दखल

## चोवीस वर्षीय तरुणीचा झोपेत मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका**
**प्रतिनिधी राजेश भडांगे**



लासलगावः- टाकळी विंचुर ता.निफाड येथील कल्याणी केशव मोकाटे हिचा झोपेत मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत असून याबाबत लासलगाव पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे. याबाबत गणेश सुरेश कापसे, रा.संधाननगर टाकळी विंचुर यांनी खबर दिली की, त्यांची बहीण कल्याणी केशव मोकाटे वय २४ हि दि.१५ मार्च रोजी रात्री ११ वा.सुमारास तिचे राहते घरात झोपली असता ती सकाळी ८ वा.पावेतो झोपेतुन उठली नाही म्हणुन तिला तिचे आईने आवाज दिला असता, तिने काही एक प्रतिसाद दिला नाही. गावातील डॉ.सचिन जांगडा यांनी तिला तपासून ग्रामीण रुग्णालयात नेण्यास सांगितले. शिवा सुरासे व तिचे आई वडील यांनी खाजगी रुग्णवाहिकेतुन ग्रामीण रुग्णलयात नेले असता डॉ.यादव यांनी मयत घोषित केले. याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा.उत्तम गोसावी अधिक तपास करीत आहेत.

## कवी प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांना मराठी काव्य सम्राट राज्य पुरस्कार



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

दैनिक साहित्य तेज साहित्य परिवार द्वारा देण्यात येणारा _मराठी काव्य सम्राट राज्य पुरस्कार_ ज्येष्ठ साहित्यिक आदरणीय भारत सातपुते सर यांच्या हस्ते लेखक कवी प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर, यांना रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी , स्वामी रामानंद तीर्थ सभागृह, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी छत्रपती संभाजीनगर, येथे देण्यात आला देण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कवी संपादक आणि अभिनेते गुलाब राजा फुलमाळी, ज्येष्ठ व्यंग कवी संजय आहेर सर, मराठवाडा विद्यापीठाचे संशोधन कार्य प्रमुख हृदयनाथ हिवराळे सर, कवी पुष्कराज गावंडे सर, ज्येष्ठ गझलकार श्री बाळासाहेब गिरी सर, कवी अड.उमाकांत आदमाने सर, प्रबोधनकार रेखा काळे मॅडम, आणि कार्यक्रमाच्या संयोजिका, साहित्य तेज वृत्तपत्राच्या संपादिका सुप्रिया जाधव हे उपस्थित होते.

## जय तुळजाभवानी महिला मंडळाच्या वतीने महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन,

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

वडगाव शेरी येथील साईनाथ नगर मध्ये जय तुळजाभवानी महिला मंडळाच्या वतीने महिलांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये स्वागत गीत, स्त्री पुरुष समानता, मुलांच्या शिक्षणाविषयी जागरूकता, स्त्रीचा जागर, संगीत खुर्ची, विविध गाण्यांवर नृत्य सादरीकरण अशा विविध कार्यक्रम सादर करण्यात आले होते या कार्यक्रमाचे आयोजन जय तुळजाभवानी महिला मंडळाचे अध्यक्षा पुनम बरके यांनी केले होते यावेळी उपाध्यक्ष जयश्री सोनवणे खजिनदार सीमा साठे, धनश्री जगताप, सचिव सीमा लोखंडे, कमल राजगुरू, रजनी रासकर, अनिता गायकवाड, पुष्पा सिनलकर, प्रतीक लोखंडे, आरती स्वामी, त्रिशा काकडे, राजेश्वरी फडतरे, ओम फडतरे, पूर्वा जाधव, भक्ती साठे, आदींसह मंडळाचे सर्व महिला सभासद उपस्थित होते,



# संच मान्यता रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात शिक्षकांचे एक दिवसीय धरणे व सत्याग्रह आंदोलन – गुणवत्तापूर्ण शिक्षण धोक्यात!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**
**यवतमाळ,17 मार्चः**
15 मार्च 2024 च्या शासन निर्णयानुसार 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठी संच मान्यता अंतिम करण्यात आली आहे. मात्र,या निर्णयामुळे राज्यभरातील शाळांमध्ये शिक्षक कपातीची भीती निर्माण झाली असून,गुणवत्तापूर्ण शिक्षण धोक्यात येण्याची शक्यता आहे.या विरोधात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती,यवतमाळ यांच्या वतीने आज दिनांक 17 मार्च (सोमवार)रोजी जिल्हा परिषदेसमोर एक दिवसीय धरणे व सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

**शिक्षक कपातीचा फटका विद्यार्थ्यांना.!**
या शासन निर्णयामुळे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणार असून,शाळांमध्ये शिक्षकांची संख्या घटणार आहे. परिणामी, विद्यार्थ्यांना त्यांच्या गावात शिक्षण घेण्याचा हक्क नाकारला जात आहे. यामुळे पालकांना आपल्या मुलांना दुसऱ्या गावातील शाळेत पाठवण्याची वेळ येणार असून, विशेषतः किशोरवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणार आहे. तसेच, विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागल्यामुळे गळतीचे प्रमाण वाढेल आणि शिक्षण व्यवस्था ढासळेल, अशी चिंता शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे.

**शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदींना छेद**
25 फेब्रुवारी 2025 रोजी शिक्षक समितीने प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले होते. त्यानंतर शासनाने 10 मार्च 2025 रोजी शालेय शिक्षण विभागाच्या पत्रानुसार इयत्ता 6 वी ते 7/8 वीच्या पटसंख्येसाठी 20 किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थ्यांकरिता एक नियमित शिक्षक मंजूर केला. मात्र, शिक्षक संघटनांच्या मते, ही तरतूद शिक्षण हक्क कायद्याच्या विरोधात असून, हा निर्णय त्वरित रद्द करावा,अशी जोरदार मागणी करण्यात आली.

**शिक्षक संघटनांचे राज्यभर आंदोलन**
या आंदोलनात राज्य जुनी पेंशन आघाडीचे प्रमुख प्रफुल्ल पुंडकर, जिल्हा नेते नानासाहेब नाकाडे, जिल्हाध्यक्ष पुंडलिक रेकलवार, सरचिटणीस संदीप मोहाडे यांच्यासह 109 पतसंस्था अध्यक्ष महेश सोनेकर, गजानन देऊळकर, किशोर सरोदे,जिल्हा उपाध्यक्ष संजय काळे, राधेश्याम चेले, गुट्टे पाटील, अभिजीत नवलकर,विजय लांडे,पुंडलिक बुटले,निशा बुटले,विजय मलकापूरे, अरविंद दहापुते,संभाजी हंगरगे,सुनिल हिंगमीरे,प्रविण शहारे,सुनिल भोयर, आशन्ना गुंडावार,विनोद क्षिरसागर, अमोल माळे,अमर गुजर,समीर डाखोरे, शेळके सर, राजेश बोकडे, पुरुषोत्तम मेश्राम, विजय लक्षेट्टीवार, विश्वनाथ कामनवार, कवडू गेडाम, रविंद्र उमाटे, विशाल साबापुरे, अभिजीत ठाकरे, शंकर मेथाडे, गणेश भागवत, संभाजी निंबाळकर, मेघराज सुर्यवंशी, विजय मुंगे, विनोद भारसाकळे, मधुकर मोरझडे, प्रकाश टेकाळे, संजय कदम, शंकर हागेपाटील, राहूल लंबे, विलास भड, घनशाम निमकर, गणेश देऊळकर, विजय वटटी, रविंद्र नंदुरकर, संजय राऊत, मिलींद अंबलकर, उमेश बुटले, हेमंत सिडाम, ओमप्रकाश पिंपळकर, बाबाराव ढवस, अशोक चटप, पुष्पजीत राणे, सुभाष लोहकरे, अनंता गाडगे, मिलींद देशपांडे, गजानन गिरी, सत्यम चौधरी, उमेश बांगर, सुनिल राठोड, अर्चना भरकाडे, सुनिता जतकर, शालिनी सिरसाट, नम्रता बिसने, स्वाती महाजन, सुनिता बुटले, वनिता झुरळे, कुमुद डाखोळे, शुभदा येवले, सुनिता गेडाम, बबिता बारले, जया सिडाम, अर्चना कुचे, प्रिया शिंदे, नंदा ठाकरे, धांदे मॅडम आदी कार्यकर्त्यांनी आपला सहभाग नोंदवला.



**राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा..**
विद्यार्थ्यांचे भवितव्य आणि शैक्षणिक दर्जा टिकवण्यासाठी शासनाने त्वरित योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शिक्षक संघटनेने दिला आहे.

# प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांची मराठी विषयाच्या प्राध्यापक महासंघाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड

### जय भवानी महाविद्यालयात संस्थेकडून सत्कार संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**
:- पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांची मराठी भाषा प्राध्यापक महासंघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. शिव जयंतीच्या अनुषंगाने मराठी भाषा विषय प्राध्यापक महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा.सुनील डिसले, राज्य कार्याध्यक्ष प्रा. संपतराव गर्जे, राज्य कार्याध्यक्षा प्रा.डॉ.मनीषा रिटे व राज्य सचिव प्रा.बाळासाहेब माने यांच्या उपस्थितीत ही निवड घोषित करण्यात आली आहे. त्यांच्या निवडी बद्दल त्यांचा पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात जय भवानी शिक्षण संस्थेचे व जगदंबा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री.प्रमोद गोरकर, संस्थेचे मुख्य लेखापाल श्री.प्रतापराव हातोटे, प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्र. प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगेज्ञव संस्थेचे सहलेखापाल श्री. श्रीराम नाना शेळके यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रा.डॉ अशोक देवगुडे यांची मराठी भाषा विषयाच्या प्राध्यापक महासंघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री शिक्षण महर्षी श्री.शिवाजीरावदादा पंडित, संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार श्री.अमरसिंह पंडित (भैय्यासाहेब) संस्थेचे सचिव श्री. जयसिंह पंडित, आमदार श्री.विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट क्लब चे कार्यवाह युवा नेते श्री. रणवीर काका पंडित, युवा नेते पृथ्वीराजे पंडित, श्री.अमृत डावकर सर, प्रा.काशीनाथ गोगुले, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य श्री.दिलीपराव जाधव यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे संचलन सुप्रसिद्ध नाटककार प्रा. बापू घोक्षे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



## अबॅकस मध्ये पनवेल शाखेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
गणितीय कौशल्य आत्मसात करीत आपली अंगभूत क्षमता विकसित करण्यासाठी प्राथमिक स्तरापासून आजचे विद्यार्थी अबॅकस च्या माध्यमातून गणितामध्ये प्राविण्य मिळवताना दिसतात. संस्कार प्रतिष्ठान अंतर्गत एवरेस्ट अबॅकस अकॅडमी पनवेल शाखेमध्ये या गणिती पद्धतीचे शिक्षण विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जातात. या संदर्भात घेण्यात आलेल्या परीक्षेत येथील विद्यार्थ्यांनी नैपुण्य संपादन करत एक प्रकारे यशाचे एव्हरेस्ट गाठले. यशस्वी विद्यार्थ्यांना अबॅकस शिक्षिका नयना थिटे यांनी मार्गदर्शन केले. एवरेस्ट अबॅकस अकॅडमी कडून 33 व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचे आयोजन ऑनलाइन स्वरूपात करण्यात आले. यामध्ये एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी पनवेल शाखेच्या विद्यार्थ्यांना विशेष उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण अँड .मनोज भुजबळ सर (माजी नगरसेवकः पनवेल महानगरपालिका ) आणि कोकण एज्युकेशन सोसायटी पनवेल येथील माजी शिक्षिका प्रशांति म्हात्रे मॅडम यांच्या उपस्थितीत पार पडला. एवरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या पनवेल शाखेच्या मयुरेश लगारे यांनी पाच मिनिटात 110 बेरीज वजाबाकी सोडवून घवघवीत यश मिळवले. याशिवाय हर्ष थिटे ,मयंक लगारे याने पहिल्या दहा क्रमांकामध्ये आणि ,स्वरांगी खडतर, पियुषी ठाकूर , रुही मोकल, यांनी एक्सेलेंट रँक मिळवली याशिवाय वैष्णवी जाधव ,प्रियांशी ठाकूर यांनी बेस्ट रँक मिळवली. विविध राज्यांमधून विद्यार्थी या स्पर्धेसाठी ऑनलाईन स्वरूपात बसले होते. अबॅकस मुळे फक्त विद्यार्थ्यांची गणिताची गती वाढत नाही तर त्यासोबत एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वास वाढतो त्याचबरोबर त्यांची बौद्धिक पातळी सुद्धा वाढते असे पनवेल शाखेच्या संचालिका नयना थिटे यांनी सांगितले.

## मातृतीर्थातील बहुजन साहित्य संमेलनाचे प्रमुख आतिथ्य हाच मोठा बहुमान ! - आ. श्वेताताई महाले, चिखली.


**दैनिक युवक आधार**
**चिखली (ज्ञानेश्वर बुधवत)** - साहित्य क्षितिजावरील सिद्धहस्त सिताऱ्यांच्या समृध्द आविष्कारांचा बेहतरीण नजराणा घेऊन येणाऱ्या मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील नियोजित बहुजन साहित्य संघ, चिखली च्या बहुजन साहित्य संमेलन - २०२५ मधे विशेष अतिथी म्हणून उपस्थित रहावे अशा नम्र विनंती सह हृद्य निमंत्रणाचे सन्मान पत्र, ब. सा. संघाचे अध्यक्ष तथा ज्यांना साहित्यिक व संवैधानिक सामाजिक योगदानासाठी राममोहन अकादमी, वेस्ट बेंगाल तर्फे नुकताच इश्वरचंद्र विद्यासागर आणि राजा राममोहन रॉय नॅशनल अवॉर्ड - २०२५ घोषित झाला आहे असे डॉ. विजयकुमार कस्तुरे, अडव्होकेट, चिखली, ज्येष्ठ कवी व सामाजिक कार्यकर्ते तथा संघाचे सचिव डॉ. डी. व्ही. खरात सर, आणि भावकवी तथा संघाचे



पदाधिकारी अंकुश पडघान, बोरगाव काकडे, चिखली यांनी, चिखली, जि. बुलढाणा च्या लोकप्रिय आमदार मा. श्वेताताई महाले यांना ऐन रंगपंचमीच्या मुहूर्तावर सन्मानाने प्रदान केले, त्यावेळी त्यांनी वरील प्रमाणे उदगार काढले आणि वेळेवर उपस्थित होण्याचे व आवश्यक सहकार्याचेही आश्वासन दिले.

## भानुदासशेठ शेलार यांचे दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**
रसायनी आनंद पवारः ठाणे जिल्हा परिषदेचे मा.सदस्य भानुदासशेठ नारायण शेलार यांचे मंगळवार दि.११ मार्च रोजी दुःखद निधन झाले.मृत्यू समयी ते ७२ वर्षाचे होते. भानुदासशेठ शेलार हे अत्यंत प्रेमळ मनमिळावू व हसतमुख स्वभावाचे होते.यांच्या दुःखद निधनाचे वृत्त समजताच पंचक्रोशीत तीव्र शोककळा पसरली. भानुदासशेठ शेलार यांच्या पश्चात पत्नी,दोन विवाहित मुलं-सुना,एक विवाहित मुलगी-जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ग्रामीण भागातील



वांगणी गावात जन्मलेले भानुदासशेठ शेलार हे सदन व उत्तम शेतकरी होते.आपला उद्योग व्यवसाय व प्रपंच सांभाळत त्यांनी राजकीय क्षेत्रातही चांगलाच वरदहस्त निर्माण केला होता. वांगणी ग्रामपंचायतीचे दोन वेळा सरपंच पद तर ठाणे जिल्हा परिषदेचे तीन वेळा सदस्य पद त्यांनी भूषवले होते. त्यांच्या आकस्मित जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असुन त्यांच्या अंत्ययात्रेत आमदार किसन कथोरे, मा.आ.सुरेशभाऊ लाड, अंबरनाथचे उपसभापती नाना जाधव,सरपंच संतोष बैकर,नंदूशेठ भोईर,विक्रम भांगरज एकनाथ शेलार यांच्यासह विविध सामाजिक,राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मंडळी सहभागी झाले होते.त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार दि. १९मार्च रोजी वांगणी येथील राहत्या घरी होणार असल्याचे कुटुंबीयांकडून सांगण्यात आले.

# इंदिरानगर (जोगेश्वरी) एस.आर.ए. घोटाळाः अपात्र पदाधिकाऱ्यांच्या बोगस निवडणुकीला सहकार कक्षाची अधिकृत मान्यता कशी?

### इंदिरानगर मधील रहिवाशांची संतप्त प्रतिक्रिया

**दैनिक युवक आधार**
**जोगेश्वरी -**
**धनश्री रेवडेकर**
मुंबई-इंदिरानगर (जोगेश्वरी) एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेतील अपात्र पदाधिकाऱ्यांनी बेकायदेशीररित्या नव्या विकासकाची निवडणूक लावली. ही संपूर्ण प्रक्रिया भ्रष्टाचाराने बरबटलेली असून,या घोटाळ्यात आता सहकार कक्षाच्या संध्या बावनकुळे यांचे नावही चर्चेत येत आहे. या निवडणुकीला भ्रष्ट प्राधिकृत अधिकारी चंद्रकांत पवार यांचे संरक्षण होते.त्यांची लाचखोरी लपवण्यासाठीच ही बेकायदेशीर निवडणूक संध्या बावनकुळे यांनी अधिकृत ठरवली का? की त्या स्वतः आता भ्रष्टाचारात सामील झाल्या आहेत? असा संतप्त सवाल येथील रहिवाशांमधून व्यक्त होत आहे. सदर प्रकरणात योजना बेकायदेशीरपणे विकत घेऊन,योजना राबविणाऱ्या जुनाच निष्कासित झालेल्या विकासकाला संगनमताने षडयंत्र रचून नव्या नावाने आणून लाखोंच्या गैरव्यवहारावर लपविण्याचा प्रकार आहे.तसेच इथल्या सभासदांनी निवडणुकी आधी आणि नंतर सुद्धा वारंवार तक्रारी करूनही त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले गेले. संध्या बावनकुळे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मं. ग्रीनझोन रिअल्टर्स या विकासकाची पाठराखण केले असल्याचा गंभीर आरोप ही रहिवाशां मधून व्यक्त होत आहे.

- निवडणुकीची माहिती जाणूनबुजून उशिराने जाहीर करण्यात आली.

. अपात्र सभासदांना निवडणूक प्रक्रियेत समाविष्ट करून विकासकाच्या बाजूने मतदान करून घेणे.

- काही पात्र सभासदांना नोटिसाच पाठविल्या नाहीत.
- पुनर्वसन सदनिकेचा लाभ घेतलेल्या सभासदांना जबरदस्तीने बोगस मतदान करायला लावले.
- बायोमेट्रिक प्रणाली असूनही मेलेल्या लोकांच्या नावावर बोगस मतदान झाले.
- एकाच व्यक्तीच्या नावावर दोन ठिकाणी मतदान झाल्याचे आढळले.

हे सगळे प्रकार म्हणजे निवडणूक निव्वळ एक फार्स होता.यात लोकशाहीचा संपूर्ण अपमान झाला असून, ही संपूर्ण निवडणूक बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट मत येथील रहिवाशांमधून व्यक्त होत आहे.

या योजनेचे मूळ विकासक मं. टाईनवाला डेव्हलपर्स होते. योजना बोगस रित्या राबविणाऱ्या शांती आणि संतोष डेव्होलोपर्स या कंपनी च्या संचालकांच्या ग्रीनझोन रिअल्टर्स या कंपनीला बेकायदेशीरपणे नव्या विकासकाचा दर्जा देण्यात आला. नियमानुसार,नव्या विकासकाने जुन्या विकासकाचा संपूर्ण खर्च आणि थकीत भाडे भरले पाहिजे होते मात्र, सुमारे ३ कोटी रुपयांचे थकीत भाडे अजूनही थकलेले असुन तरीही झोपेचे सोंग घेतलेल्या प्राधिकरणाने नियम झुगारून पुढील परवानग्या दिल्याने येथील रहिवाशांमधून आश्चर्य व्यक्त होत आहे.

या योजनेत अजूनही अनेक प्रलंबित बाबी आहेत –

- पर्यावरण विभाग व भारतीय विमान प्राधिकरणाची ना-हरकत प्रमाणपत्रे न घेतल्यामुळे दंडात्मक कारवाई प्रलंबित आहे
- फायर सेफ्टी परवानगी नाही.
- A.C.B. (लाचलुचपत विभाग) आणि E.O.W. (आर्थिक गुन्हे शाखा) च्या चौकशी सुरू आहेत.

तरी देखील झोपेच्या सोंग घेतलेल्या या लबाड प्राधिकरणाने मं. ग्रीनझोन रिअल्टर्सला सर्व परवानग्या कशा दिल्या? याचे समाधानकारक उत्तर अद्याप कोणीही
ऊ न शकल्याने इंदिरानगर रहिवाशांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

१५ वर्षांपासून ही योजना लाल फितीत अडकून पडली आहे. जुना विकासक नाव बदलून पुन्हा घुसवण्यात आला,आणि याच्याशी संबंधित सर्व भ्रष्ट अधिकाऱ्यांना संरक्षण दिले जात आहे.मात्र इथली जनता आता स्वस्थ बसणार नाही असा गंभीर इशाराही येथील रहिवाशांनी संबंधित प्रशासनाला दिला आहे. घूसकोरी करून पुनर्वसन इमारतींमध्ये १५० बेकायदेशीरपणे रहिवासी आणले गेले, त्यातील ८३ सभासदांचे भाडे थकीत आहे.हे प्रकरण केवळ आर्थिक गैरव्यवहार नव्हे,तर सरकारी अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा अत्यंत गंभीर बाब असल्याचे येथील रहिवाशांमधून बोलले जात आहे. सभासदांनी याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयाच्या आदेशाशिवाय ही योजना पुढे जाऊ शकत नाही.पण प्रश्न असा आहे की,सहकार कक्ष, झोपुप्राधिकरण,आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी होणार का? संध्या बावनकुळे यांनी या प्रकरणात लक्ष घालून लाच घेतली आहे का? गेंड्याच्या कातडीचे प्राधिकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यांनी कोट्यवधींचा घोटाळा करून हा प्रकल्प कायमस्वरूपी अडवण्याचा डाव रचला आहे का? याचे उत्तर येणाऱ्या काळात स्पष्ट होईल. मात्र,येथील रहिवासी अजूनही न्यायच्या प्रतीक्षेत आहेत आणि जोपर्यंत येथील रहिवाशांना न्याय मिळत नाही तोपर्यंत हा लढा असा सुरू ठेवणार असा संकल्प रहिवाशांनी व्यक्त करत कोणत्याही परिस्थितीत न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहणार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय स्वस्त वस्त्र नाहीत असा निर्धार रहिवाशांनी प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केला.

# छत्रपती शिवाजी महाराज मंदिर (शक्तीपीठ) लोकार्पण संपन्न

**पान १ वरून** माध्यमातून महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेक आणि पुढे संभाजी महाराजांची वाटचाल असे अतिशय सुरेख प्रसंग उभे करण्यात आले आहेत. यातून प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. जसे हनुमानाचे दर्शन घेतल्याशिवाय प्रभू श्रीरामांचे दर्शन पूर्ण होत नाही तसेच छत्रपती शिवरायांच्या दर्शनाशिवाय कुठल्याच देवाचे दर्शन पूर्णत्वास येत नाही. आई जिजाऊंच्या संस्कारांनी अन् आशिर्वादाने शिवबा घडले. त्यांच्या प्रेरणादायी शिकवणीतूनच शिवरायांनी मुघलांच्या आव्हानांचा प्रतिकार करायला सुरुवात केली. प्रभू श्रीराम हे युगपुरुष होते. त्यांनी समाजातील सर्वात शेवटच्या व्यक्तीमध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची शक्ती निर्माण केली. त्याप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आहे. रावणाविरुद्ध लढताना जसे श्रीरामांनी सर्वसामान्यांना एकत्र केले तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या बलाढ्य फौजेविरुद्ध सर्वसामान्य जनतेतून शक्ती निर्माण केली आणि भगवा झेंडा फडकविला. जातीपातीत विभागलेला महाराष्ट्र महाराजांना अपेक्षित नाही. देव, देश आणि धर्मापायी सर्वस्व पणाला लावणारा, देशाचा गौरव वाढविण्याचा संकल्प करणारा महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची 300 वी जन्मशताब्दी साजरी होत असताना देश घडविण्याच्या कार्यात आपले योगदान देवू या, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले. ते पुढे म्हणाले की, राज्य व केंद्र शासनाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा म्हणून नोंद होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संगमेश्वर येथे देखील छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार असून त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. पानिपत येथील लढाई सर्वांना माहितच आहे. महादजी शिंदे यांनी गाजविलेला पराक्रम सर्वांना माहीत आहे. त्या ठिकाणीही भव्य स्मारक उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. आज लोकार्पण झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शक्तीपिठाला तीर्थस्थळाचा दर्जा देण्यात येईल. त्याचप्रमाणे भिवंडी-वाडा या रस्त्याचेचे कामही प्रगतीपथावर आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने या शक्तीपिठाकडील येणाऱ्या सर्व मार्गांचे नियोजन उत्तमरित्या करावे, येथे येणाऱ्या शिवप्रेमींसाठी आवश्यक सोयीसुविधा तयार कराव्यात. शासन यासाठी तत्पर असून याकरिता निधीची कमतरता पडणार नाही. कार्यक्रमाच्या सुरुवातीस आयोजन समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शाल, पुष्पगुच्छ आणि लोकार्पण झालेल्या मंदिराची प्रतिकृती देवून सत्कार केला. या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील व आमदार किसन कथोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द•ख•ल

## पनवेल तालुका पोलिसांनी 48 मोबाईल केले परत



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांनी पाच लाख 76 हजार रुपये किमतीचे 48 मोबाईल हस्तगत केले आणि ते मूळ मालकांना परत केले.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल चोरी आणि गहाळ झालेले मोबाईल बाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार पनवेल तालुका पोलिसांनी मार्च 2025 पर्यंतचे गहाळ झालेल्या मोबाईल पैकी एकूण 48 मोबाईल सीईआयआर पोर्टल द्वारे हस्तगत केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे,पोलीस निरीक्षक गुन्हे आनंद कांबळे यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गीजे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, पोलीस हवालदार महेश धुमाळ, सुनील कुदळे, भीमराव खताळ यांनी विविध राज्यातून 48 मोबाईल हस्तगत केले. 17 मार्च रोजी तक्रारदार यांना पोलीस ठाण्यात बोलवून त्यांचे मोबाईल फोन त्यांना परत करण्यात आले आहेत. मोबाईल फोन परत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण होते.

## लोकलमधून पडून जखमी झालेल्या अज्ञात महिलेच्या नातेवाईकांचा पोलिसांकडून शोध

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल ते वडाळा या लोकल गाडीतून पडून गंभीर जखमी झालेल्या अज्ञात महिलेच्या नातेवाईकांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. मानखुर्द रेल्वे स्टेशन दरम्यान कि.मी.27/127 जवळ पनवेल ते वडाळा या लोकल गाडीतून पडून एक महिला गंभीर जखमी झाली आहे. तिची उंची 5 फुट 4 इंच, अंगाने सडपातळ, रंगाने गहू वर्ण, चेहरा उभट, नाक सरळ, दात शाबूत, केस काळे लांब असून हातात लाल रंगाचा दोरा, अंगात काळ्या फुल फुलांची डिझाईन असलेल्या टॉप, नेस काळ्या रंगाची लेगीज रंगाचे लेगीज घातलेली आहेत. सदर जखमी महिला बेशुद्ध असून सायन हॉस्पिटल मुंबई येथे उपचार चालू आहेत. तरी सदर जखमी महिलेची कोणी वारस नातेवाईक, मित्र मिळुन आल्यास वाशी रेल्वे पोलीस ठाणेत संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी सहा पोलीस निरीक्षक दराडे (मो.नं. 9822011744), पो. हवा मंडले (मो. नं. 8108516222), बावस्कर (मो. नं. 8806632575) यांच्याशी संपर्क साधावा.

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख प्रवीण जाधव यांच्या सौजन्याने ममता चषक क्रिकेट स्पर्धा संपन्न



दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर) : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख प्रवीण जाधव यांच्या सौजन्याने ममता चषक महिला टर्फ बॉक्स क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या ममता चषक महिला टर्फ बॉक्स क्रिकेट स्पर्धेच्या आयोजक प्रभाग 20 च्या विभाग संघटीका रेश्मा कुरुप या होत्या. याप्रसंगी शहरप्रमुख प्रवीण जाधव, उपजिल्हा संघटीका सकपाळ, युवा सेना जिल्हाध्यक्ष पराग मोहिते, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, महिला शहर संघटीकाअर्चना कुळकर्णी, उपशहर संघटीका उज्वला गावडे, विभाग संघटीका अश्विनी देसाई, युवा सेना शहरप्रमुख निखिल भगत, पत्रकार राजेंद्र पाटील, विभागप्रमुख अमित माळी, अमित परसाळे, उपविभागप्रमुख केशल भगत, शाखा प्रमुख राकेश भगत, संतोष तळेकर, प्रदीप माखीचा आदी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये हार्मोनी वॉरियर या महिला संघाने प्रथम क्रमांक पटकाविला तर द्वितीय क्रमांक ड्रीम 25 या संघाने पटकाविला.



**दैनिक युवक आधार -** ठाणे : दिवा शहरातील श्रीमंतयोगी प्रतिष्ठान आयोजित दातीवली तलाव येथे तिथीनुसार भव्य दिव्य शिव जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता प्रसंगी प्रतिष्ठानचे आधारस्तभ शशिकांत पाटील व पदाधिकारी यांनी उपस्थित अनेक मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.
**( अमित जाधव )**

# सीकेटी महाविद्यालय व विद्यालयातील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र विधान मंडळ प्रत्यक्षण भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

तरुणांचे राष्ट्र, जगातील सर्वात मोठी लोकशाही अशी बहुविध बिरुदे असणाऱ्या देशातील तरुणांमध्ये संसदीय लोकशाहीच्या मूल्यांचे रोपण करण्यासाठी तथा राज्यविधिमंडळाच्या विधीनिर्मिती प्रक्रियेबाबत महाविद्यालयीन व माध्यमिक विद्यार्थ्यांना जागरूक करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर स्वायत्त महाविद्यालय, नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर ठाकूर इंग्रजी माध्यमिक स्कुलमधील विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या चमूने आज (दि. १७) महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला भेट दिली. महाराष्ट्राचे विधानभवन ही





सर्वासाठी पवित्र वास्तू आहे. लोकशाहीचे महत्व आणि महानता या वास्तूच्या कानाकोपऱ्यातून जाणवते. विद्यमान आणि भावी पिढीला मार्गदर्शक असलेली अनेक ऋषीतुल्य माणसं या वास्तुनं बघितली, लोकशाहीची मूल्ये जोपासून राज्याला कायद्याच्या चौकटीत बांधणाऱ्या या कायदेमंडळाच्या इमारतीचं राजकीय नेत्यांना, कार्यकत्यांना जेवढं आकर्षण आहे तेवढंच समाजाच्या इतर घटकांना देखील आहे. आणि त्या अनुषंगाने राज्यातील विविध शाळा महाविद्यालयांतील विद्यार्थी, काही शिष्टमंडळे अभ्यास दौऱ्यांतर्गत येथे येत असतात. त्यानुसार विद्यार्थी व प्राध्यापकांच्या शिष्टमंडळाने विधिमंडळाच्या विधानसभा व विधानपरिषदेचे कामकाज त्यांनी प्रेक्षक गॅलरीतून पाहिले. यावेळी सभागृहात चालणाऱ्या कामकाजाची त्यांनी माहिती घेतली. दोन्ही सभागृहाचे कामकाज पार पडल्यानंतर लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या चमू सोबत मुक्त संवाद केला व अश्या प्रकारच्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या सातत्यपूर्ण आयोजनाबाबत शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.आकाश पाटील, भुगोल विभागाचे प्रमुख डॉ. दीपक नारखेडे, गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुभाष उन्हाळे, अर्थशास्त्र वरिष्ठ प्राध्यापक काकासाहेब ढवळे, चांगू काना ठाकूर इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका मनिषा नारखेडे, उमेश पोद्दार आदी उपस्थित होते.

# संधिवाताचे लवकर निदान आवश्यक : डॉ. रचना शानभाग

**मुकुंद कांबळे सहसंपादक**
**दैनिक युवक आधार**

**पनवेल,ता. १७ :** दिवसेंदिवस लहान मुले आणि तरुणांमध्ये संधिवाताचे प्रमाण वाढत चालले आहे, साधारण १ लाख मुलांच्या पाठीमागे १० मुले या आजाराने ग्रस्त होतात. याला वेळीच आळा घालण्यासाठी लवकर निदान (early detection ) होणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत DR, रचना शानभाग-मोहिते यांनी व्यक्त केले. WORD day ( World Young Rheumatic Disease Day) निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. साई चाईल्ड केयर क्लिनिक येथे कार्यक्रम झाला. साई चाईल्ड केयर क्लिनिक आणि IAP पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. dr शानभाग या अनेक वर्षांपासून पीडियाट्रिक इम्युनॉलॉजि अँड ऱ्हउमटोलॉजी तज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत.



या कार्यक्रमाला ३५ वर्षाहून अधिक काळ बालरोग तज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेले साई चाईल्ड care क्लिनिक चे प्रमुख Dr.महेश मोहिते, फिजीओथेरपीस्ट Dr.श्रुती द्रविड, IPCCA चे सदस्य ग्यानप्रकाश, मोहन , पालक,आणि लहान मुले उपस्थित होते.

संधिवाता सारख्या आजारासोबत दोन हात करण्यासाठी व्यायाम अत्यंत आवश्यक आहे. छोट्या छोट्या खेळांमधून मुलांकडून कसा व्यायाम कसा करून घेऊ शकतो हे प्रात्यक्षिकामधून dr.श्रुती द्रविड यांनी पालकांना समजावून सांगितले. dr द्रविड यांनी घेतलेल्या खेळांना मुलांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. WORD day निमित्त झालेलया कार्यक्रमात लहान मुलासाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. मुलांनी विविध रंगाचा उपयोग नानाविध चित्रे रेखाटली. यास्पर्धेमधील पहिल्या ३ क्रमांकाची बक्षिसे देण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक ओम पगारे, द्वितीय क्रमांक आर्या पाटील आणि तृतीय क्रमांक श्लोक मढवी यांनी मिळविला यावेळी जादूचे प्रयोग करण्यात आले, जादूगाराने केलेल्या विविध प्रयोगांसोबत मुलांनी धमाल केली. साई चाईल्ड care क्लिनिक चे प्रमुख Dr.महेश मोहिते यांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना dr. महेश मोहिते म्हणाले कि, संधीवात या आजाराकडे लक्ष देण्याची गरज आहे. पनवेल मध्ये या आजाराचे उत्तम निराकरण होत असून रुग्णांनी या सेवेचा लाभ घेणे आवश्यक आहे.

## माती उत्खनन करून विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

चिखले ग्रामपंचायतचे माजी सरपंच व ग्रामसेविका यांनी अवैध प्रकारे माती उत्खनन करून विक्री केल्याप्रकरणी त्यांच्यावर आणि जमीन खरेदी करणारे, माती विक्री करणाऱ्यावर अपहाराचा आणि फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यासाठी दत्तात्रय तांडेल आणि चिखले ग्रामस्थांनी पंचायत समिती, पनवेल येथे आमरण उपोषण पुकारले आहे.

चिखले येथील ग्रामपंचायतच्या नावे असलेली जमिनीतून ग्रामसेविका आणि माजी सरपंच यांच्या संगनमताने हजारो ट्रक माती उत्खनन करून करोडो रुपये लाटल्याचा आरोप केला जात आहे. माती उत्खनन करून विक्री केल्याप्रकरणी अपहाराचा आणि फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा, त्याचबरोबर सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. या मागणीसाठी 17 मार्चपासून चिखले ग्रामस्थ यांनी पंचायत समिती पनवेल येथे आमरण उपोषण सुरू केले आहे.




## भारतीय बौद्ध महासभा लोणार तालुक्याच्या वतीने बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती बाबत बिहारचे मुख्यमंत्री यांना निवेदन.

**अमरावती विभागीय**
**संपादक संदीप मापारी पाटील**
**लोणार .**

दिनांक 17 मार्च 2025 रोजी भारतीय बौद्ध महासभेचे लोणार तालुका वतीने बुद्धगया येथील महाबोधी महाविहार गैर बौद्धांच्या ताब्यातून मुक्त करण्याबाबत मा. तहसीलदार साहेब लोणार यांच्या मार्फत बिहार राज्याचे मुख्यमंत्री निवेदन देण्यात आले. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे जगभरातील बौद्ध धर्मीयांचे श्रद्धास्थान व पवित्र स्थळ आहे. भारतातील अन्य धर्मियांचे धार्मिक स्थळे हे त्या त्या धर्मीयांच्या नियंत्रणाखाली आहे. परंतु बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्ध धर्मीय स्थळ असून सुद्धा गैर बौद्धांच्या ताब्यात आहे आणि म्हणून महाबोधी महाविहार बौद्धांच्या नियंत्रणा खाली यावे अशी मागणी भारतीय बौद्ध महासभा लोणार तालुक्याच्या वतीने सदर निवेदनातून करण्यात येत आहे. शिवाय बिहार सरकारने महाबोधी महाविहार अधिनियम 1949 हा कायदा पूर्णपणे रद्द करण्यात यावा, आणि महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध धर्मीयांच्या हाती सोपवावे अशी मागणी सदर निवेदनात करण्यात आली. या मागणीला विविध बौद्ध संघटना ,राजकीय पक्ष, राजकीय संघटना यांनी सुद्धा आपला पाठिंबा दिला. निवेदन सादर करताना बौद्ध महासभेचे सदाशिव



साबळे सर, राहुल अंभोरे, नागवंशी संघपाल पनाड, मेहकर-लोणार विधानसभा नेते, सुधाकर वानखडे, ,सरस्वती ताई साबळे,तुळशीदास घेवंदे, विजय सरकटे सर, रत्नमाला मुळे,वैशाली खरात,आम्रपाली तुरुकमाने,अर्चना कांबळे ,पंचशीला मोरे,उषाताई नरवडे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते तसेच रिपब्लिकन नेते भाई संघपाल पनाड,वंचितचे ज्येष्ठ नेते डॉ के. बी. इंगळे, भाई दीपक अंभोरे, भाई महेंद्र मोरे , इतर पक्ष संघटनेचे सुदन अंभोरे सर, तानाजी अंभोरे, समाधान सरदार इत्यादींच्या सह्या आहेत. तुकाराम साळवे जी.के. तुरुकमाने प्रतीक्षा गवई ,पल्लवी मोरे, नंदा सरकटे ,रत्नमाला इंगोले, छाया भालेराव, रेखा ससाने ,उषा अंभोरे, सुरेखा भगत, कुसुम मोरे ,रुक्मिणी कांबळे, अलका घेवंदे ,स्नेहलता गवई, भारती अवसरमोल तथा समस्त बौद्ध समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आम्ही दिलगीर आहोत " चा प्रकाशन समारंभ...

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

**सुप्रसिद्ध विचारवंत कवी इशान** संगमनेरकर यांच्या "आम्ही दिलगीर आहोत."या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ सोहळा " मुंबई गोरेगाव कवितांगण येथे संपन्न झाला. समाजाचे वास्तव दाखविणारे आणि आपल्या समृध्द विचार विद्रोही सडेतोड मांडणारे ईशान संगमनेरकर यांनी आपले आपल्या या पुस्तकात मांडून मराठी साहित्याला मोठे योगदान दिले आहे.हे विचार रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी प्रकाशन समारंभ प्रसंगी विचार मांडून ईशान यांचे भरभरून कौतुक केले.ज्योती सामंत गांधी यांनी ईशान यांच्या अभ्यासपूर्ण लेखन गुणांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी गौरीताई गाडेकर, कवी मच्छिंद्र म्हात्रे, पत्रकार पंकज दळवी,कवी अनिल भोईर,अक्षता गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती. कवितांगणच्या ६३ कवींनी कवितांचे वाचन आणि गायन केले.







# सणसरच्या सख्या बहिणीनी पुणे जिल्हा बाल चित्रकला स्पर्धेमध्ये मिळविले यश.

**दैनिक युवक आधार**
**सणसर:- विकास क्षत्रिय**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबई व पुणे जिल्हा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'बाल दिनाच्या' निमित्ताने घेण्यात आलेल्या 'बाल चित्रकला स्पर्धा 2025' या स्पर्धेमध्ये श्री.छत्रपती हायस्कूल सणसरच्या दोन सख्या बहिणींनी यश मिळविले. या बाल चित्रकला स्पर्धेमध्ये गट तीन मध्ये इयत्ता सातवीतील कु.प्रिया विठ्ठलराव निंबाळकर हिने पुणे जिल्ह्यातून चतुर्थ क्रमांक मिळविला तर तिची मोठी बहीण इयत्ता आठवीतील कु.आर्या विठ्ठलराव निंबाळकर हिने गट चार मध्ये पुणे जिल्ह्यातून उत्तेजनार्थ येण्याचा मान मिळविला.या दोन्हीही विद्यार्थिनीस पुणे जिल्हा परिषद शिक्षण विभाग माध्यमिकचे शिक्षणाधिकारी डॉ.श्री.भाऊसाहेब कारेकर साहेब तसेच महाराष्ट्र राज्य कला शिक्षक संघाचे संस्थापक श्री




हुसेन खान चाचा,उपाध्यक्ष श्री. किरण सरोदे सर,महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव व पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री सागर सर,पुणे जिल्हा कला शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री मिलिंद शेलार सर,सचिव श्री. वाहिद खान सर, व्यंग चित्रकार श्री तांबोळी सर,इंदापूर तालुका कला शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री अमीन मुल्ला सर यांच्या शुभहस्ते सेंट विन्ससेन्ट हायस्कूल पुणे या ठिकाणी प्रमाणपत्र व सुंदर ट्रॉपी देऊन सन्मान करण्यात आला. पुणे जिल्ह्यातून जवळ जवळ 45 हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यामध्ये इंदापूर तालुक्यातील श्री.छत्रपती हायस्कूल सणसरच्या विद्यार्थिनींनी हे यश संपादन केल्यामुळे गुरुवार दि 13/3/2025 रोजी विद्यालयामध्ये छोट्याशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सर्जे एस.डी.सर यांचे शुभ हस्ते कु.आर्या विठ्ठलराव निंबाळकर व तिची छोटी बहीण कु.प्रिया विठ्ठलराव निंबाळकर यांचा सन्मान करण्यात आला या विद्यार्थिनींना विद्यालयाचे आदर्श कलाशिक्षक श्री.परशुराम हरिदास घाडगे सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे श्री छत्रपती शिक्षण संस्था भवानीनगर चे अध्यक्ष श्री प्रशांत दादा काटे,श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्री.अमोल दादा पाटील संचालक अड.श्री रणजीत भैय्या निंबाळकर डॉ.श्री दीपक निंबाळकर सणसर गावचे सरपंच श्री यशवंत दिलीप नरूटे विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या वतीने यशस्वी विद्यार्थिनींचे त्यांना मार्गदर्शन करणारे कलाशिक्षकाचे अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी यशस्वी विद्यार्थिनींची आई सौ.अश्विनी विठ्ठलराव निंबाळकर या उपस्थित होत्या. त्यांचे देखील विद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. संभाजी भोईटे सर यांनी केले.व आभार विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री सोनवणे पी डी सर यांनी मानले.

## तळोजा एमआयडीसी मधील हायकल लिमिटेड या कंपनीच्या व्यवस्थापनाच्या मनमानी विरोधात आपल्या न्याय हक्कासाठी भूमिपुत्र आमरण उपोषणाला बसले.

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर ( कार्यकारी संपादक**

माजी आमदार शेतकरी कामगार पक्षाचे बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व भूमिपुत्र आमरण उपोषणासाठी तळोजा एमआयडीसी मधील हायकल लिमिटेड या कंपनीच्या गेटच्या समोर बसलेले आहेत. उपोषणकर्त्यांमध्ये विनायक दामोदर पाटील, अजय पद म्हात्रे,

अशोक चंदर पाटील, बाळाराम मंगळ्या पाटील, सुरज वासुदेव पाटील, महेश चाहू पावशे आदी शेतकरी आपल्या न्याय हक्कासाठी आमरण उपोषणाला बसलेले आहेत. भूमिपुत्रांना डावलून व्यवस्थापनाने त्यांच्या मर्जीतील ठेकेदाराला काम दिल्यामुळे सदर भूमिपुत्र उपोषणाला बसलेले आहेत. सदर उपोषणाची माहिती उपोषणकर्त्यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात, पोलीस अधीक्षक नवी मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक तळोजा एमआयडीसी, स्थानिक पत्रकार यांना दिली असल्याचे प्रकल्पग्रस्तांनी सांगितले. आपल्याला न्याय न दिल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असे देखील प्रकल्पग्रस्तांनी सांगितले. महिलांसह प्रकल्पग्रस्तांच्या नातेवाईकांनी आज आंदोलनासाठी गर्दी केलेली दिसत होती.






## शिवस्मारक समिती घाटकोपरतर्फे घाटकोपर(प.)अमृत नगर सर्कल येथे शिवजन्मोत्सव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

बृहन्मुंबई महानगर पालिका एन विभागात कार्यरत असलेल्या शिवस्मारक समिती घाटकोपरचे संस्थापक अध्यक्ष शिवभक्त श्री.संजय दत्तात्रय भालेराव यांच्या तर्फे घाटकोपर पश्चिम येथील अमृत नगर सर्कल येथे शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला शिव आरती करिता शिवसेना नेते आ.आदित्यसाहेब ठाकरे, शिवसेना सचिव आ.वरूणजी सरदेसाई, ईशान्य मुंबईचे खा.संजयभाऊ दिना पाटील व ईशान्य मुंबई ०८ विभाग प्रमुख सुरेश पाटील ,१२६ स्थानिक मा. नगरसेविका अर्चना संजय भालेराव,समन्वयक ईम्रान शेख,ग्राहक संरक्षण कक्ष वार्ड संघटक १२६ रतन ताजणे,१२३ वार्ड संघटक राजेंद्र पेडणेकर, १२४ वार्ड संघटक यशवंत खोपकर व शिवभक्त पदाधिकारी शिव आरतीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शिवस्मारक समिती संस्थापक/अध्यक्ष शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या नेतृत्वाखाली घाटकोपर मध्ये शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा ! अवघे वातावरण झाले शिवमय

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज);** माजी नगरसेवक शिवभक्त संजय दादा भालेराव यांनी गनिमी कावा करत घाटकोपर पश्चिम अमृत नगर सर्कल याठिकाणी २७ मार्च २०१६ रोजी शिवजयंती दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वरूढ मूर्तीची स्थापना केली. तसेच शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या संकल्पनेतून तसेच निधीतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याच्या ठिकाणी सुशोभीकरण करून शिवस्मारक बांधण्यात आले.तेव्हा पासून याठिकाणाला एक वेगळी ओळख व वेगळे महत्त्व मिळाले असून याठिकाणाला छत्रपती शिवाजी महाराज चौक,अमृत नगर असे नाव देण्यात आले.याचे सर्व श्रेय शिवभक्त संजय दादा भालेराव यांचे असून तेव्हा पासून दरवर्षी शिवस्मारक समितीचे संस्थापक/अध्यक्ष तथा माजी नगरसेवक शिवभक्त संजय दादा





भालेराव हे याठिकाणी तिथी दिवशी मोठ्या उत्साहात शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करतात.घाटकोपर मधीलच नाही तर मुंबई मधील सर्वात मोठा शिवजन्मोत्सव सोहळा हा फक्त घाटकोपर मध्ये शिवभक्त संजय दादा भालेराव हे साजरा करतात. तेव्हापासून हे शिवस्मारक घाटकोपर मधील हजारो तरुणांचे शक्तिस्थान बनले आहे. यावेळी शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या आदल्या रात्री म्हणजे रविवार दि.१६ मार्च रोजी मध्यरात्री ठिक बारा वाजता शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना नेते युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे व शिवसेना युवासेना सचिव आमदार वरुण सरदेसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत ईशान्य मुंबई लोकसभेचे खासदार संजय दिना पाटील,युवासेना कार्यकारिणी सदस्य राजोल संजय पाटील,माजी नगरसेविका डॉ.अर्चना संजय भालेराव यांच्या हस्ते हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांची शिव महाआरती करण्यात आली.यावेळी 'जय भवानी,जय शिवराय' असा जयघोषात अवघे वातावरण शिवमय झाले होते. तसेच फाल्गुन तृतीया दि.१७ मार्च रोजी तिथी प्रमाणे शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ साजरा करण्यात आला असून सकाळी ठिक ८.वा.शिव अभिषेक,शिव वंदना,आरती व पुजा करण्यात आली,त्यानंतर सायंकाळी पुन्हा ६.वा. हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत शिव महाआरती करण्यात आली.यावेळी शिव स्मारकाला आकर्षक फुलांनी सजवण्यात आले होते.तसेच शिवस्मारकाला केलेल्या आकर्षक रोषणाई तसेच लेझर शो मुळे शिवस्मारकाचे तेज डोळ्याचे पारणे फेडत होते.शिवजन्मोत्सव दिवशी दिवसभर याठिकाणी साहसी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके आणि ढोल - ताशा पथकांचे स्फूर्तिदायक वादन,पारंपारिक वेशभूषेत नटलेले आबालवृद्ध,..'जय भवानी,जय शिवाजी' असा जयघोष..अग्रभागी असणारी शिवज्योत आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वरूढ पुतळा अशा स्फूर्तिदायी आणि शिवमय वातावरणात शिवस्मारक समितीचे संस्थापक/ अध्यक्ष शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या नेतृत्वाखाली तसेच सर्व हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत शिवछत्रपतींना मानवंदना देण्यात आली.यावेळी घाटकोपर मधूनच नाही तर मुंबईच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवभक्त या शिवजन्मोत्सव सुवर्ण सोहळ्यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत असतात.त्यामुळे हा शिवजन्मोत्सव सोहळा घाटकोपर मधीलच नाही तर मुंबई मधील सर्वात मोठा शिवजन्मोत्सव नावाजला जातो. यावेळी शिवस्मारक समिती- शिव आरती संघ,घाटकोपरच्या सर्व शिवभक्तांनी या शिवजन्मोत्सव सोहळ्यासाठी कठोर परिश्रम घेतले.

## पनवेल तालुक्यातील 14 शाळांचे विज बिल थकल्याने कनेक्शन तोडले

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

विज बिल थकल्याने पनवेल तालुक्यातील 14 शाळांचे कनेक्शन तोडण्यात आले आहे. त्यामुळे या शाळांचा वीज पुरवठा खंडित झाला आहे. शिक्षण विभागाने यावर वेळीच तोडगा काढायला हवा. तालुक्यात जिल्हा परिषदेच्या 246 शाळा आहेत. या शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंतचे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तालुक्यातील सागाची वाडी, धामणी, टावरवाडी, कोंबलटेकडी, देहरंग, खैरवाडी, शिरवली, आंबे तर्फे तळोजे, कुत्तरपाडा, करंबेळी तर्फे तळोजे, कोंडप, मोसारे, पाटनोली, नानोशी या चौदा शाळांचे विज बिल थकल्याने कनेक्शन तोडण्यात आले आहे. हे थकित बिल कोणी भरायचे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. ग्रामपंचायतीकडे पैसे नसल्याने याकडे दुर्लक्ष करत आहेत. रायगड जिल्हा परिषदेचा कारभार सध्या प्रशासक पाहत असून तालुक्यातील काही ग्रामपंचायतीचा कारभार देखील प्रशासकांच्या हाती आहे. शिक्षण विभागासह ग्रामपंचायत विज बिल भरण्यास टाळाटाळ करत असल्याचे समोर आले आहे. मात्र शाळेत विज नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

सागाची वाडी येथे मीटर उपलब्ध नसून शेजारील घरातून विद्युत सुविधा पुरविण्यात येत आहे. धामणी येथील थकीत रक्कम भरणेबाबत ग्रामपंचायतकडे पाठपुरावा सुरू आहे. टावरवाडी येथे सोलर विद्युत सुविधेतून अंशतः सुरू आहे. कुंबलटेकडी येथे फेब्रुवारी अखेर थकीत रक्कम बाकी आहे. शिरवली आणि आंबे तर्फे तळोजा येथे बिल भरण्यासाठी ग्रामपंचायतकडे पाठपुरावा सुरू आहे. कुत्तरपाडा येथील वीज मीटर कापण्यात आले आहे. खैरवाडी येथे महावितरणकडे नवीन कनेक्शनसाठी अर्ज करण्यात आला आहे. देहरंग आणि करंबेळी तर्फे तळोजा येथील मीटर काढून नेण्यात आले. कोंडप येथील वीज मीटर कट केले आहे. मोसारे, पाटणोली, नानोशी येथे वीज मीटर साठी आवश्यक रक्कम भरणा केली आहे अशी माहिती पंचायत समिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

## सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा नवा मोंढा उमरी येथील मोठ्या उत्सवात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर** रयतेच्या मनात स्वाभिमान जागृत करणारे, रयतेच्या स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारे लोककल्याणकारी शासनकर्ते अखंड हिंदुस्थानचे आराध्यदैवत, बहुजनप्रतिपालक कुळवाडीभूषण, शस्त्रास्त्रपारंगत, न्यायनीतीधुरंदर, हिंदु धर्मरक्षक, हिंदवी स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी त्रिवार मानाचा मुजरा तमाम जनतेस शिवजन्मोत्सव सोहळा साजरा शिवजन्मोत्सव सोहळा नवा मोंढा उमरी येथे मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला यावेळी अनेक स्पर्धा,व विविध कार्यक्रम घेण्यात आले, या कार्यक्रमाला लोककल्याणकारी नेते श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी, राष्ट्रवादीचे नेते डॉ. विक्रम देशमुख, ज्येष्ठ नेते पांडुरंग अण्णा देशमुख गोरठेकर,माजी नगराध्यक्ष श्री सुभाषराव पेरेवार,रेल्वे डिव्हिजन चे मेंबर श्री पारसजी दर्डा,श्री अनिलजी दर्डा, श्री ज्ञानेश्वर पाटील कदम,एक्स आर्मी विजय कदम,राजु अण्णा,पांडुरंग कोल्हेवाड,बालाजी पाटील पवार,व अनेक मान्यवरांची व सर्व शिवप्रेमी युवक, जेष्ठ, महिला,विध्यार्थी,सर्व गावकरी मानेवर यावेळी उपस्थित होते.





## महिला बेरोजगार प्रशिक्षण व सत्कार सोहळा उत्साहात संपन्न









**दैनिक युवक आधार**
**मुबंई प्रतिनिधी प्रमुख**
**किशोर रमाकांत गुडेकर**
**मुंबई** : "तू स्वयं सिद्ध हो" या अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन मुंबई शहर आणि बी इन ग्रुप फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बेरोजगार प्रशिक्षण मार्गदर्शन शिबिर पार पडले.सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ऍड. योगिता सावंत यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. समाजसेवक श्री. संजय माळी आणि बी इन ग्रुप फाउंडेशनच्या विश्वस्त रोहिणी जाधव यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा गायकवाड यांनी प्रभावीपणे केले, तर वैशाली पवार आणि त्यांच्या टीमच्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जगदीश गायकवाड, उमेश गायकवाड, गणेश भालेराव, योगिता सावंत, रामचंद्र घाडगे, मंजुळा मोरे, लता खराडे आणि नम्रता कदम यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते, त्यामध्ये प्रसिद्ध उद्योगपती नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, काँग्रेस नेते चरणजित सप्रा, डॉ. शैलेश जाधव, काँग्रेसचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य ॲड. जीवनदत्त अरगडे आणि संजय निंबाळकर यांचा समावेश होता. समाजासाठी भरीव कार्य: बी इन ग्रुप फाउंडेशन समाजाच्या वंचित घटकांसाठी सातत्याने कार्यरत आहे. आदिवासी पाडे, भटक्या-विमुक्त समाजाच्या वस्त्यांमध्ये कपडे, अन्नधान्य, औषधे वाटप तसेच मेडिकल आणि एज्युकेशनल कॅम्प राबवले जातात.

## रविवार अपघातवार ;राष्ट्रीय महामार्गावर पुन्हा अपघात ; बल्क ट्रक पलटी- चालक जखमी

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**



मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर रोजच अपघात होत असून येथील पोलिस ठाण्याच्या हद्दीत रविवार 16 मार्च रोजी दुपारी झालेल्या अपघातानंतर सायंकाळी 06.00 वाजण्याच्या सुमारास सुकेळी खिंडीजवळ खैरवाडी गावा समोर बल्क ट्रक पलटी चालक गंभीररित्या जखमी झाला. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, नीतिनकुमार रामचंद्र यादव वय 32 वर्षे रा. लखनौ हा हा रविवार 16 मार्च रोजी आपल्या ताब्यातील बल्क ट्रक क्रमांक MH 43 BG 6837 चालवीत कोलाड बाजूकडून मुंबई बाजूकडे जात असता ; त्याचा ट्रक सायंकाळी 06.00 वाजण्याच्या सुमारास आला असताना रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करीत बेदारकारपणे गाडी चालवील्याने अवघड वळणावर आपल्या गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे गाडी सरळ दुभाजकावर आदळून पलटी झाला. या अपघातात ट्रक चालक यादव गाडीच्या अडकून पडल्याने त्याला सुखरूपरीत्या बाहेर काढण्यात आले. ज्जखमी झालेल्या चालकावर त्यानंतर जिंदाल रुग्णालयात प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी पनवेलकडे रवाना करण्यात आले अपघातचा पुढील तपास सहा.पो. नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला उप निरीक्षक राजेश्री तिवरे करीत आहेत.

## आम्ही मैत्रिणी योग ग्रुप व महिला पतंजली योग समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
आम्ही मैत्रिणी योग ग्रुप व महिला पतंजली योग समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन साजरा
**कळंबोली**
दोन वर्षांपूर्वी दोन वर्षांपूर्वी सिडको गार्डन रोडपाली सेक्टर २०येथे डॉ. प्रभा वाडकर यांनी शोभा सावळकर व इतर चार जणी मिळून गार्डनमध्ये योग प्राणायाम सुरु केला या ग्रुप मध्ये 60 हुन अधिक महिला जोडल्या गेल्या आहेत. या योग ग्रुप च्या वतीने अनेक उपक्रम राबविले जातात आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत आम्ही मैत्रिणी योग ग्रुप व महिला पतंजली योग समिती पनवेल



यांच्या संयुक्त विद्यमाने चाळिशीनंतर महिलांनी आपले आरोग्य कसे सांभाळावे " या विषयावर डॉ सागर सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित केले होते .त्यामध्ये आनंदी आणि तणावमुक्त जगण्यासाठी आपल्या आरोग्याची आपणच काळजी घ्यावी. बदलत्या जीवनशैलीत मोसमी फळे , पालेभाज्या युक्त सकस आहार, व्यायाम, सकारात्मक असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. "कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला पतंजली योग समितीच्या राज्य प्रभारी सुनिता नानोटे होत्या. यावेळी ऍड सुवर्णा यादव यांनी ," महिलांनी अत्याचार सहन न करता कायद्याची निर्भयपणे मदत घ्यावी.कायदे स्त्रियांच्या बाजूने असून वेळीच गुन्ह्यांची नोंद झाल्यास न्याय मिळणे सुलभ होते . आर्थिक दृष्ट्या दुर्बल महिलांना विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत सल्ला व मदत मिळू शकते असे सांगत वारसा हक्क, कौटुंबिक हिंसाचार , सायबर गुन्हे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात सुनिता जी नानोटे यांनी भारतीय परंपरेचे महत्व विशद केले. महिला पतंजली योग समिती पनवेलच्या जिल्हा प्रमुख छायाजी जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांचे स्वागत शोभा सावळकर , उर्मिला पाटील, प्रमिला वैदीकर,बारकाबाई यांनी केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय, आभारप्रदर्शन डॉ. प्रभा वाडकर यांनी केले.या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत योग शिक्षिका मीना अग्रवाल व मंगल ,सुजाता , साखरे ,राजश्री , वर्षा,रेणू ,आशा यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला . या वेळी आदर्श महिलांना प्रातिनिधिक स्वरूपात, मां जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी यांच्या भूमिका छोट्या मुलींनी साकारल्या .कु. श्रेया वाडकर ( मां जिजाऊ ), कु.आशी ( अहिल्याबाई),कु .जिया वानखडे ( सावित्रीबाई ) ,कु.जिया नायकरे यांनी या भूमिका साकारल्या

## स्व संरक्षणार्थ - जकात

पवित्र रमजान महिन्यांमध्ये प्रत्येक जण आपल्या वार्षिक व्यवहाराचा हिशोब करून जर आपण जकात देण्यास पात्र असू तर ती आदा करीत असतो.जकात देण्याचे सुद्धा काही निकष आहेत.ज्याला आवश्यकता आहे त्यालाच ती दिली पाहिजे.ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्यांना जकात देता येत नाही.जकातीचा मुख्य उद्देश हा व्यक्तीच्या दैनिक आवश्यक गरजा पूर्ण करणे,दारिद्र्य निर्मूलन करणे हा आहे. त्यासाठी समाजातील गोरगरिबांना शोधून त्यांची मदत केली पाहिजे. जकात देताना घेणारी व्यक्ती कोणत्याही प्रकारे अपमानित होणार नाही, तिची समाजामध्ये फार चर्चा होणार नाही,घेणाऱ्याला कमीपणा वाटणार नाही अशा पद्धतीने द्यावयाची असते. एका हाताने देतांना दुसऱ्या हाताला सुद्धा खबर होणार नाही ही पद्धत त्यासाठी अंगीकारली पाहिजे. अनेक प्रसंगांमुळे माणसे अडचणीत येतात. व्यवहारात झालेले मोठे नुकसान,मोठी चोरी, अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान अशा विविध कारणांमुळे चांगली चांगली माणसं कंगाल होऊन जातात. अशा लोकांना मदतीची खूप गरज असते. काही घटक असे असतात कि त्यांचं कोणी नसतं. त्यांना मदतीची आवश्यकता असते. काही कुटुंब अशी आहेत कि त्यांचं पालनपोषण करणारा कोणी नाही. अशांना मदतीची आवश्यकता असते. अनाथ,विधवा,आजारी, निराधार लोकांना सुद्धा मदत करण्याची आवश्यकता असते. समाजातील अशा सर्व प्रकारच्या गरजू घटकांना जकातीच्या रकमेतून मदत केली जाते.हे एक प्रकारचे गुप्तदान आहे. याचा फार गवगवा किंवा देखावा करू नये. अल्लाहतआलाची मर्जी संपादन करण्यासाठी त्याच्या आदेशानुसार आपण हे सत्कार्य करीत आहोत.याचा मोबदला आपल्याला तोच देणार आहे ही श्रद्धा ठेवून जकात दिली




जाते. इथे वशिलेबाजी अजिबात चालत नाही.जकात आदा करण्यासाठी केला जाणारा हिशोब स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरुन करावयाचा असतो.येथे घोटाळा चालत नाही. त्यासाठी आपले सर्व व्यवहार लिहून ठेवा असे हजरत पैगंबरांनी सुद्धा सांगितले आहे. तोंडी व्यवहारांमध्ये गफलत होण्याची शक्यता असते.म्हणून कोणताही व्यवहार,कुणाशी जरी केला जात असला तरी त्याची नोंद करून ठेवली पाहिजे.कारण विस्मरणामुळे आपण विसरून जातो आणि मग त्यातून नवे प्रश्न निर्माण होतात.त्यासाठी आर्थिक असो किंवा इतर प्रकारचे व्यवहार लिहून ठेवणे आवश्यक आहे. जकात वर्षभरात कधीही आदा केली तरी चालते.मात्र रमजान महिन्यांमध्ये प्रत्येक कामाला सत्तर पट पुण्य मिळत असल्यामुळे ती रमजानमध्ये आदा करण्याची रीत जगभर आहे.अनेक वेळा काही कारणास्तव सर्व व्यवहार ठप्प होतात. त्यामुळे अनेक माणसं आणि त्यांची घरे वरून चांगली दिसत असली तरी आतली परिस्थिती फक्त त्यांनाच माहिती असते.अशा वेळी अशा सर्व घटकांना समाजातून मोठी मदत दिली जाणे अपेक्षित असते. अशा वेळी रमजान महिन्याची वाट न पाहता सर्व घटकांनी मदतीचा हात गरजूंना दिला पाहिजे.त्याचा मोबदला अल्लाहतआला प्रत्येकाला चांगला देईल याबद्दल कोणीही शंका बाळगू नये. जकात अदा करताना ती आवश्यकता असणाऱ्यांना गेले पाहिजे याची कटाक्षाने काळजी घेणे आवश्यक आहे.आज काल रमजान महिन्यात जकातीची रक्कम घेण्यासाठी खोटे बोलून फसवणारे लोक सुद्धा येतात.त्यांचे पासून सावध राहून शहानिशा करूनच आपण आपली जकात दिली पाहिजे. (क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

## पाणी म्हणजे जीवन 'आणि जीवन मिळविण्यासाठी परदेशी कुटुंबियांना करावा लागत आहे संघर्ष.

### ८९ वर्षीय अनंत रामजीवन परदेशी यांनी अवलंबिला आमरण उपोषणाचा मार्ग.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**
"पाणी" हे जीवन आहे सर्व सजीवांसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आणि हेच पाणी पिण्यासाठी मिळविण्यासाठी परदेशी कुटुंब गेल्या ३८ वर्षापासून हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायत हद्दीतील रहिवासी आहेत,आणि ते तेथील मतदार आहेत, ग्रामपंचायतीमध्ये पिढ्यांपिढ्या ते तेथील रहिवासी आहेत.वेळच्या वेळी कर भरत आहेत. अस असुनही ग्राम आरोग्य पाणीपुरवठा समितीने त्यांचा पाणीपुरवठा गेले तीन महिने १ जानेवारी पासून बेकायदेशीर बंद केला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर ही प्रशासन कारवाई करत नसल्याने परदेशी कुटुंबावर फार मोठे पाण्याचे संकट ओढावले आहे. अनेक मार्गाने शासकीय, निमशासकीय, कोर्टाची मदत घेऊन ते या समस्येवर तोडगा काढण्यासाठी गेली कित्येक वर्षे झटत आहेत पण प्रत्येक वेळी त्यांच्या या समस्येला केराची टोपली दाखविली जात आहे. पाण्यासाठी त्यांचा लढा हा ते सर्व कुटुंबिय एकत्र येऊन कायदेशीर रित्या लढत आहेत. पण प्रत्येक वेळी त्यांची निराशा होत आहे. पाईपलाईन फक्त दिसते ,पण पाणी येत नसल्याने आज त्यांच्या डोळ्यातील पाणी मात्र थांबत नाही.त्यामुळे ते स्वतः टॅंकरने पाणी मागवत आहेत. प्रशासनाच्या आदेशानुसार ते जरी शांतपणे आपला "पाणी लढा" लढत असले तरी पाणी पुरवठा करण्यासाठी अजूनही कोणतेही पाऊल प्रशासनाने उचललेले नाही. आज विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे की पृथ्वीवरील पाणी घेऊन तो इतर ग्रहावर संशोधनासाठी जात आहे. मोठमोठे शोध लावत आहे. पण पृथ्वीवर रहाणाऱ्या परदेशी कुटुंबियांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे हि आपल्या देशासाठी, राज्यासाठी उरण तालुक्यासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे. उच्च अधिकारी, पोलीस कारवाई जर परदेशी कुटुंबियांना न्याय मिळवून देत नाहीत म्हणून परदेशी कुटुंबियांना आपला न्याय मिळविण्यासाठी उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागला आहे. पाणी पुरवठा अचानक बंद केल्याच्या निषेधार्थ आणि आपली न्याय बाजू मांडण्यासाठी ८९ वर्षीय अनंत रामजीवन परदेशी यांनी सोमवार दिनांक १७ मार्च



रोजी सकाळी १० वाजल्यापासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्यासाठीचा मार्ग अवलंबिला. सदरचे उपोषण सुरू केले असता मा. तहसीलदार,उरण मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती उरण मा. वरिष्ठपोलीस निरिक्षक पोलीस ठाणे उरण नवी मुंबई ,यांच्या कडून लेखी देण्यात आले आहे की, ग्रामपंचायत हनुमान कोळीवाडा अंतर्गत असलेला पाणी पुरवठा पोलीस बंदोबस्त घेऊन परदेशी कुटुंबियांना दिनांक २० मार्च २०२५ पर्यंत चालू करण्यात येईल. परदेशी कुटुंबियांना प्रशासनाकडून लवकरच त्यांचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी उपाय योजना व्हावी.

# परिवहन सेवेच्या वर्षपूर्तीत नव्या बसमुळे प्रवासाला वेग!

**उल्हासनगर**
उल्हासनगर शहराच्या रस्त्यांवरून धावणाऱ्या बसेसचे चाक १० वर्षं थांबले होते, पण त्यानंतर २०२४ साली सुरू झालेल्या त्या गतिमान सेवेला आता एक वर्ष पूर्ण झाले! प्रवाशांसाठी हक्काची, माफक दरातील आणि वातानुकूलित व नॉन-एसी बससेवा सुरू झाल्याने हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. १२ मार्च २०२४ रोजी सुरू झालेल्या या सेवेचा वर्षपूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

२०१४ पासून उल्हासनगरमध्ये परिवहन सेवा बंद होती. त्यामुळे स्थानिक नागरिकांना महागड्या रिक्षांवर किंवा खासगी गाड्यांवर अवलंबून राहावे लागत होते. अनेकदा बससेवा पुनरुज्जीवित करण्याच्या निविदा प्रक्रिया बारगळल्या. मात्र, १२ मार्च २०२४ रोजी तत्कालीन मनपा आयुक्त अजिज शेख आणि वाहन विभाग प्रमुख विनोद केणे यांच्या प्रयत्नांनी ही सेवा अखेर सुरू झाली. परिणामी, उल्हासनगर, अंबरनाथ, शहाड, बदलापूर आणि कल्याण या शहरांना जोडणारी परिवहन सेवा पुन्हा कार्यरत झाली.




या बससेवेसाठी राष्ट्रीय हवा शुद्धीकरण प्रकल्पांतर्गत १२ मीटरच्या ५ वातानुकूलित बस आणि ९ मीटरच्या १० नॉन-एसी बस ताफ्यात समाविष्ट करण्यात आल्या. विशेष म्हणजे, या बसेस पूर्णपणे इलेक्ट्रिक चार्जिंगवर चालतात, त्यामुळे प्रदूषणाच्या समस्येत मोठी घट झाली आहे. सध्या उल्हासनगर ते बदलापूर हा प्रवास केवळ ३० रुपयांत वातानुकूलित बसने आणि आणखी स्वस्त दरात नॉन-एसी बसने करता येतो. यामुळे रोज प्रवास करणाऱ्या कामगार, विद्यार्थी आणि नागरिकांसाठी ही सुविधा वरदान ठरली आहे.

परिवहन सेवेमुळे वाहतूककोंडी कमी होण्यास मदत झाली असून, सध्या ४० चालक आणि ४० वाहक प्रवाशांच्या सेवेत कार्यरत आहेत. दररोज ५ फेऱ्या सुरू असून लवकरच या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या बससेवा ट्रान्सव्होल्ट उल्हासनगर प्राय. लि. कंपनी मार्फत सुरू आहे. या कंपनीचे गौरव वेदक, शशिकांत वडनेरे, तुषार महाले, दीपा तिवारी, निशांत घाडगे-पाटील, रवीना कांबळे, आशिष कदम, श्रीधर खोत आणि इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वर्षपूर्तीचा आनंद साजरा केला.

### परिवहन सेवा विस्ताराची तयारी

नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी या सेवेला आणखी वेग देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पंतप्रधान योजनेच्या माध्यमातून अधिक निधी मिळवून १०० बसेस आणि अत्याधुनिक बसस्थानके उभारण्याची तयारी सुरू आहे. त्यामुळे भविष्यात ही बससेवा ठाणे जिल्ह्यासह इतर भागांतही विस्तारली जाणार आहे.

# सिडको सदनिकांच्या क्षेत्रफळात कपात करू नये

■ माजी आमदार संदीप नाईक यांची मागणी ■ एलआयजी गटाच्या सदनिकांचे क्षेत्रफळ केले कमी




**नवी मुंबई** : सिडकोची महागृहनिर्माण योजना 'माझे पसंतीचे घर' २०२४ मध्ये लॉटरी विजेत्यांना मूळ जाहीर केलेल्या क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येत असल्याचे उघड झाले आहे. माजी आमदार संदीप नाईक यांनी यासंदर्भात सिडको प्रशासनाकडे लॉटरी विजेत्यांना योजनेच्या मूळ माहितीपत्रकात नमूद करण्यात आलेले क्षेत्रफळच देण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

सिडकोने 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटक (EWS ईडब्ल्यूएस) आणि अल्प उत्पन्न गट (एलआयजी) साठी २६,००० घरांची लॉटरी जाहीर केली होती. यामध्ये पनवेल (प.), खारघर बस टर्मिनस, मानसरोवर रेल्वे स्थानक, खांदेश्वर रेल्वे स्थानक, खारकोपर सेक्टर-१६ या आणि वाशी ट्रक टर्मिनस या ठिकाणी एलआयजी गटासाठी ३२२ चौरस फूट कार्पेट एरिया असलेल्या सदनिका जाहीर करण्यात आल्या होत्या. यावेळी जाहीर करण्यात आलेल्या माहितीप्रमाणे एलआयजी गटासाठी ३२२ चौरस फूट कार्पेट एरिया असलेल्या सदनिका देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते.

मात्र, लॉटरी निकालानंतर विजेत्यांना सदनिकेचा रेरा कारपेट एरिया २७.१२ चौरस मीटर (२९१.९१ चौरस फूट) इतका असल्याचे एलआयजी गटासाठी नमूद करण्यात आले आहे, जो मूळ घोषणा केलेल्या क्षेत्रफळापेक्षा जवळपास ३० चौरस फुटांपेक्षा कमी आहे.

### हक्काचे क्षेत्रफळ हिरावून घेऊ नये!



माजी आमदार संदीप नाईक यांनी यावर आक्षेप घेत सिडको प्रशासनाने गृहनिर्माण योजनेच्या मूळ माहितीपत्रकात उल्लेख केलेल्या ३२२ चौरस फूट कार्पेट एरिया असलेल्या सदनिकाच लाभार्थ्यांना द्याव्यात, लॉटरी विजेत्यांना सिडकोने जाहीर केल्याप्रमाणे क्षेत्रफळाच्या सदनिकाच देण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या क्षेत्रफळापासून वंचित ठेवले जाणार नाही, याची खबरदारी सिडकोने घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, नगरविकास विभाग आणि सर्व संबंधित विभागांकडे माजी आमदार संदीप नाईक यांनी या संदर्भात मागणी केली आहे.

# मीरा-भाईंदरमध्ये शिवसेना ठाकरे गटात गळती सुरूच

**भाईंदर** : मीरा-भाईंदरमधील उद्धव सेनेत प्रभावी नेतृत्व नसल्याने गळती सुरूच असून अनेक माजी नगरसेवक व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शिंदेसेनेत व भाजपमध्ये प्रवेश केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजल्यास ही गळती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पक्षाच्या विभागणीनंतर माजी खासदार राजन विचारे यांचा आधार स्थानिक पदाधिकारी व तत्कालीन नगरसेवकांना वाटत होता. मात्र लोकसभा निवडणुकीपाठोपाठ ठाण्यातून विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर विचारे यांचे देखील मीरा-भाईंदरकडे लक्ष कमी झाल्याची खंत ठाकरे गटातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. लोकसभेत विचारे यांचा पराभव आणि राज्यात भाजप, शिंदे सेना व राष्ट्रवादी अजित पवार गट महायुतीचे विधानसभेत प्रचंड यश मिळून सरकार आल्याने येणाऱ्या महापालिका निवडणुकीआधी अनेक जण आपले राजकीय भवितव्य शोधू लागले आहेत.

त्यातूनच ठाकरे गटात असलेले माजी विरोधी पक्ष नेते प्रवीण पाटील, माजी नगरसेवक बर्नड डिमेलो, शर्मिला बगाजी, जॉर्जी गोविंद, अरविंद ठाकूर, महिला शहर संघटक तेजस्विनी पाटील, पदाधिकारी राजू ठाकूर, जितेंद्र पाठक, शिवशंकर तिवारी, सम्राट राऊतसह अन्य अनेक पदाधिकारी व सैनिकांनी शिंदेसेनेत प्रवेश केला आहे. त्याआधी माजी नगरसेविका तारा घरत व युवासेना अधिकारी पवन घरत, माजी नगरसेवक जयंती पाटील, उपजिल्हाप्रमुख जयराम मेसेसह अनेक पदाधिकारी व शिवसैनिकांनी शिंदेसेनेची साथ धरली होती.

उबाठाचे उपजिल्हा प्रमुख लक्ष्मण जंगम यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्या आधी तत्कालीन महिला जिल्हा संघटकने केलेल्या वादात पक्षाकडून देखील अन्याय झाला म्हणून उबाठाचे उपजिल्हाप्रमुख शंकर वीरकर यांनी अपेक्षा वीरकर व समर्थकांसह भाजपची वाट धरली होती, तर उबाठातील गळती रोखण्यासाठी प्रभावी अशा हालचाली होत नसल्याची खंत जुन्या शिवसैनिकांनी व्यक्त केली आहे.

### शिंदेसेना व भाजपमध्ये चढाओढ सुरू

आता महापालिका निवडणूक पुन्हा काहीशी पुढे गेली असली तरी उबाठातील पदाधिकारी, माजी नगरसेवक, सैनिकांना आपल्याकडे घेण्यासाठी शिंदेसेना व भाजपमध्ये चढाओढ सुरू आहे. उबाठातील माजी नगरसेविका नीलम ढवण यांनी आपण शेवटपर्यंत ठाकरेंच्या शिवसेनेत राहणार असल्याचे म्हटले आहे, तर उद्धव सेनेतील काही माजी नगरसेवक आणि अनेक पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

# धुलिवंदन करून परतणाऱ्या कुटुंबावर हल्ला!

**उल्हासनगर** : धुलिवंदनचा आनंद साजरा करून सासरवाडीतून परतणाऱ्या कुटुंबावर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उल्हासनगरमध्ये घडली. काही माथेफिरूंनी तरुणीची छेड काढत तिच्या परिवारावर लोखंडी रॉड आणि दगडांनी हल्ला केला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये हा संपूर्ण प्रकार कैद झाला असून, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत एक आरोपीला अटक केली आहे, तर इतरांचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धुलिवंदन साजरा करून एक महिला आपल्या परिवारासह घरी परतत होती. ते तिन्ही वेगवेगळ्या गाडीतून प्रवास करत असताना फक्कड मंडी मार्गावर आरोपींनी त्यांच्या वाहनांना अडवले. सुरुवातीला दोन तरुणांनी तरुणीची छेड काढण्याचा प्रयत्न केला. त्याला विरोध करताच त्यांनी महिलेच्या कुटुंबीयांना कॉलरला धरून शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली.

जेव्हा तरुणीने भांडणे सोडविण्ययाचा प्रयत्न केला, तेव्हा तिला ढकलून दिले, ज्यामुळे ती खाली पडून जखमी झाली. त्यानंतर आरोपींनी आणखी दोन साथीदारांना फोन करून बोलावले, ज्यांनी लोखंडी रॉड आणि दगडांचा वापर करत कुटुंबावर बेदम मारहाण केली.

# नवी मुंबईत ३८.७९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नवी मुंबई** : नवी मुंबई पोलिसांनी नशामुक्त नवी मुंबई अभियानांतर्गत दिघा ईश्वर नगर येथील एका घरावर छापा मारून गांजा, एमडी पावडर, तसेच देशी आणि विदेशी दारूचा मोठा साठा जप्त केला आहे. पोलिसांनी या कारवाईत एकूण ३८ लाख ७९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून जीवन बबन ढाकणे (२७) याला अटक केली आहे.

दिघा येथील ईश्वर नगरमध्ये राहणारी एक महिला आणि तिचा मुलगा हे दोघेही गांजा, एमडी तसेच दारूचा अवैध साठा करून त्याची विक्री करत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या कक्ष-१ला मिळाली होती. सदर माहितीच्या शुक्रवारी दिघा ईश्वर नगरमधील सिडको चाळीतील संशयित घरावर छापा मारून आरोपी जीवन बबन ढाकणे (२७) याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याच्या घराची झडती घेतली असता त्याच्या घरामध्ये २१ किलो ७४० ग्रॅम गांजा, १७० ग्रॅम एमडी, २० लिटर गावठी हातभट्टीची दारू तसेच देशी आणि विदेशी दारूच्या बाटल्या, असा तब्बल ३८ लाख ७९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. न्यायालयाने आरोपीची १८ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

# उल्हासनगरात तरुणासह बहिणींना मारहाण

**उल्हासनगर** : उल्हासनगरातील हनुमाननगर टेकडीवर रंगपंचमीच्या उत्साहाला हिंसेचे गालबोट लागले आहे. रंगांच्या नावाखाली एकतर्फी उद्दामगिरी सुरू असताना, निष्पाप तरुणावर जबरदस्ती रंग फासून त्याचे कपडे फाडले गेले. याचा जाब विचारला असता, त्याच्यावर आणि त्याच्या दोन बहिणींवर लोखंडी रॉडने अमानुष हल्ला करण्यात आला. विशेष म्हणजे, हा प्रकार इथेच थांबला नाही, तर पीडिताने पोलिसांत तक्रार दिल्यास जीव घेण्याची धमकी देखील देण्यात आली.

ही धक्कादायक घटना दीपक प्रजापती या तरुणासोबत घडली. दीपक संध्याकाळी हनुमान नगरमधून घरी जात असताना त्या परिसरातील काही तरुणांनी रंगपंचमी साजरी करत त्याला बळजबरीने रंग लावला. विरोध करताच त्याचे कपडे फाडले. त्यावेळी त्याच्या दोन बहिणी मदतीला आल्या असता, आरोपींनी त्यांनाही लोखंडी रॉडने मारहाण केली. यावेळी अश्लील शिवीगाळ करत त्यांना पोलिसांत तक्रार दिल्यास जीव मारण्याची धमकी देण्यात आली.

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला नवी मुंबईत पाठिंबा

**नवी मुंबई** : बिहारच्या बुद्धगया येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी नवी मुंबईमध्ये रविवारी शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महाबोधी महाविहार बचाव कृती समिती, नवी मुंबई यांच्या वतीने आयोजित या रॅलीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ही शांतता रॅली वाशी येथील बुद्ध प्रतिष्ठान येथून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समाप्त झाली. या रॅलीत बौद्ध उपासक आणि उपासकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन बौद्ध एकतेचे दर्शन घडवून दिले. उपस्थित नागरिकांनी महाबोधी महाविहाराच्या मुक्तीसाठी नारे दिले आणि सरकारने तातडीने योग्य पावले उचलावीत, अशी मागणी केली.

महाबोधी महाविहार हे जागतिक वारसा स्थळ असून बौद्ध समाजासाठी हे महाविहार अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यावर बौद्ध धर्मियांचा हक्क अबाधित राहावा,



आणि त्यावर योग्य प्रशासनाची स्थापना व्हावी, अशी या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे.

या शांतता रॅलीची प्रस्तावना व सूत्रसंचालन डॉ. अनंत हर्षवर्धन, भदंत प्रज्ञानंद महाथेरो, सिद्राम ओहोळ, महेश खरे, शिल्पा रणदिवे, विकास सोरटे, संदेश बनसोडे आदी मान्यवरांनी आपले विचार मांडले.

या रॅलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल समन्वयक सचिन दत्तू कटारे यांनी सर्व सहभागी संस्था, बौद्ध उपासक आणि उपासका, पत्रकार, पोलीस प्रशासनाचे आभार मानले. या रॅली मध्ये सुधाकर सोनवणे, जगदीश गायकवाड, राजेश शिंदे, विरेंद्र लगाडे , नामदेव जगताप, चंद्रकांत जगताप, रेखा इंगळे, शीलाताई बोधडे, शशिकला जाधव, प्रतीक जाधव, अश्वजीत जगताप, आदींसह हजारोंच्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका सहभागी झाले होते. या रॅलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल समन्वयक सचिन कटारे यांनी सर्व सहभागी संस्था, बौद्ध उपासकांचे आभार मानले. ही रॅली यशस्वी करण्यासाठी विजय कांबळे, ॲड. यशपाल ओहोळ, एल. आर गायकवाड, टिळक जाधव, विक्रांत चिकने, रवींद्र गायकवाड, रमेश बनसोडे, युवराज मोरे, नारायण मोरे, अभिमान जगताप, मनोहर साळवे, उत्तम रोकडे, आदींनी मेहनत घेतली.

# कर्जत येथे 23 मार्चला भव्य कवी संमेलन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

शहीद भगतसिंग स्मृतिदिनानिमित्त रायगड जिल्हास्तरीय भव्य कवी संमेलनाचे आयोजन कोमसाप कर्जत शाखेच्या वतीने मंगळवार दिनांक 23 मार्च 2025 रोजी दुपारी 2.30 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज स्मारक का जवळ, महालक्ष्मी गेस्ट हाऊस, मोठे वेणगाव तालुका कर्जत येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक रायगड भूषण तथा जनसंपर्क प्रमुख कोमसाप एल बी पाटील,असून या कार्यक्रमा साठीप्रमुख उपस्थिती म्हणून कोमसाप रायगड महाडचे अध्यक्ष सुधीर शेठ, रायगड भूषण, ज्येष्ठ पत्रकार प्राध्या. जयपाल पाटील अलिबाग, कोमसापचे पनवेल गणेश कोळी,मुरुड कोमसापचे अध्यक्ष संजय गुंजाळ,प्रभाकर शेठ शेळके उद्योजक, शेळके बंधू मंगल कार्यालय किरवली, भाई गायकर ज्येष्ठ शिवसेना नेते रायगड, यांची असून विशेष सन्मानित कवी पुरुषोत्तम मुळे(तळा), सौ. ज्योत्स्ना राजपूत खालापूर,आहेत स्वागताध्यक्ष ॲड. गोपाल शेळके अध्यक्ष कोमसाप कर्जत (चित्रपट निर्माते कुणब्याचं पोर) हे कार्यक्रमाचे प्रमुख सूत्रसंचालक अनिल भोईर पनवेल, मच्छिंद्र म्हात्रे उरण, जनार्दन सताने खालापूर, ॲड. संतोष जोहेकर हे करणार असून कार्यक्रमाचे निमंत्रक ॲड. सतीश शेळके, ॲड. भारती डाकवळ,ॲड कल्पना बाजले,ॲड. निशा शेळके,ॲड. श्रद्धा म्हसे, ॲड. प्रसाद शेळके, प्राध्यापक वैष्णवी ठोंबरे, प्राध्यापक मयुरा गायकर ॲड.प्रीती शेळके, मारुती बागडे गुरुजी, ज्ञानेश्वर वाडीले सर,सोनावणे सर आहेत. कार्यक्रमासाठी रमेश आंबवणे,नारायण देशमुख, प्रशांत मराडे, निवृत्ती ढाकवळ, गणेश धाकवड, वसंत कोकरे, रामजी हिलम, वैभव ठोंबरे, शरद ठाणगे, प्रकाश गायकवाड, राजाराम मोहिते, दत्तात्रेय शेळके, विवेक बडेकर, तानाजी बडेकर, यश मराडे, राजाभाऊ कोकरे श्रीमती मीराबाई मराडे यांचे सहकार्य लाभणार आहे. या भव्य दिव्य कवी संमेलनात रायगडातील कवी- कवियत्रींना सहभागी होण्याचे असल्यास त्यांनी आपली एक कविता ॲड.सतीश शेळके यांच्या व्हाट्सअप क्रमांक 98811 32248 वर दिनांक 21 मार्च 2025पर्यंत पाठवावी असे आवाहन कोमसाप कर्जत शाखा अध्यक्ष ॲड. गोपाळ शेळके यांनी केले आहे.

# न्यू ऑरेंज सिटी अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटीतील गैरव्यवहार प्रकरणी तातडीने चौकशीचे आदेश

दैनिक युवक आधार

पनवेल (प्रतिनिधी) न्यू ऑरेंज सिटी अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी मर्यादित संस्थेतील गैरव्यवहार संदर्भात तातडीने सखोल चौकशी करून एक ते दिड महिन्यात चौकशी अहवाल सादर करून पुढील कार्यवाही करणार असल्याची माहिती सहकार राज्य मंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज विधिमंडळाच्या अधिवेशनात दिली नागपूर जिल्ह्यातील न्यू ऑरेंजसिटी अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी मर्यादित संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या रकमेत केलेल्या गैरव्यवहाराचा मुद्दा आज विधानसभेत उपस्थित झाला. या संस्थेच्या अध्यक्षांनी ठेवीदारांच्या ठेवींच्या रक्कमेत गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाकडून देण्यात आलेल्या उत्तराच्या अनुषंगाने उपप्रश्न उपस्थित केला. कलम ८८ च्या अंतर्गत कारवाई सुरु असल्याचे उत्तर शासनाकडून देण्यात आले आहे. २१ एप्रिल २०२३ च्या आदेशान्वये ८८ची चौकशी सुरु झालेली आहे. अशा पद्धतीचा ज्या वेळेला गैरव्यवहार होतो त्या वेळेला या संदर्भामध्ये लवकरात लवकर जबाबदारी निश्चित करणे आणि अशा प्रकरणातील वसुली करून ठेवीदाराला न्याय मिळवून देणे अपेक्षित असते. जर दीर्घकाळ चौकशी चालू राहिली तर ठेवीदारांना न्याय कसा मिळणार असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित करून किती कालावधीमध्ये चौकशी पूर्ण होईल आणि संबंधित ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करण्याची मागणी सभागृहात केली.

या प्रश्नावर सभागृहात उत्तर देताना नामदार डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केलेला प्रश्न खरा आहे. न्यू ऑरेंजसिटी अर्बन क्रेडीट को-ऑप सोसायटी मर्यादित संस्थेमध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेल्या आहेत. या गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी विशेष लेखापरीक्षक २ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निश्चितच चौकशीला उशीर झाला आहे त्यामुळे या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून एक ते दिड महिन्याच्या आत चौकशी अहवाल सादर केला जाईल असे सांगून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे त्यांनी सभागृहात आश्वासित केले.

# यशवंत विद्याल पालोद शाळेतील माजी विद्यार्थी आले एकत्र

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथील यशवंत विद्यालय शाळेतील १९९७-९८ च्या दहावीच्या बॅचचे विद्यार्थी स्नेहमेळाव्यानिमित्त नुकतेच एकत्र आले होते. यावेळी प्रत्येक जण आठवणीत हरवल्याने वातावरण भावुक झाले होते. या कार्यक्रमासाठी शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक दिनकर शिंदे, तेजराव जंजाळ, आकाश पांढरे,आर.के.गायकवाड,एस. टी.दौड, प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे,विष्णू फरकाडे , बनसोड सर, सुभाष गोरे,एच.बावस्कर, पांडुरंग दनके , बाबु पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. जमलेल्या तत्कालीन वर्ग मित्रांनी सर्वप्रथम गुरुजनांचे पूजन केले.२८ वर्षानंतर एकमेकांचे बदललेले चेहरे, राहणीमान आणि बोलीभाषा यांचे निरीक्षण करीत विद्यार्थीदशेतील आठवणींनी अनेकांचे डोळे भरून आले होते. पहिली ते दहावीपर्यंत सोबत शिक्षण घेणारे वर्गमित्र दहावीनंतर वेगवेगळ्या क्षेत्रात स्थायिक झाले. कोणी उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी गेले, कोणी व्यवसायात, तर कोणी नोकरीत सक्रिय झाले. काही शेतकरी झाले. एकमेकांपासून दुरावलेले हे वर्गमित्र काही वर्षांनी समाज माध्यमातून एकत्र आले. व यानंतर त्यांनी स्नेहमेळावा आयोजित केला. त्यानंतर भविष्यात शाळेसाठी व सामाजिक योगदान देण्याचा निश्चय करून सर्वांनी जेवणाचा आस्वाद घेऊन एकमेकांचा निरोप घेतला. याप्रसंगी डॉ.राहुल पालोदकर, विठ्ठल पालोदकर, प्रकाश जाधव, गणेश बलांडे, राजू गोरे, खंडू अपार, विजय दांडगे, अनिस शेख, शेख हाजी, समाधान राऊत,सुरेश ढोरमारे, नंदकुमार मोढेकर, विजय मरकडे, नानासाहेब गोराडे, समाधान बावस्कर, ज्ञानेश्वर कोळी, विजय काकडे, समाधान खेळवणे, रत्नप्रभा बोर्डे, भगीरथी मोढेकर, मंदा खेळवणे, सुनिता पालोदकर, नेत्रा जोशी, संगीता सोनवणे, सुनिता खेळवणे, सरिता जाधव, अनिता सपकाळ, कोकिळा मिसाळ, शोभा वरपे, अर्चना मंगरूळकर, शकुंतला वरपे, आदी विद्यार्थी-विद्यार्थीनीची उपस्थिती होती.